www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

दैं.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 169 वार बुधवार दि. 05 मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## जेडब्ल्यू मारिओट येथे आयकॉनिक गोल्ड अवॉर्ड्स मध्ये ईपीआरचा आनंददायी सहभाग




**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

जेडब्ल्यू मारिओट येथे आयकॉनिक गोल्ड अवॉर्ड्स शो प्रोग्राम आयोजित करण्यात आला, ज्यामध्ये अनेक नामंकित दिग्गज कलाकार आले होते. अनुपम खेर, कार्तिक आर्यन, फरदिन खान , हर्षवर्धन राणे, शरद केळकर, अधा शर्मा, नुसरत बरूचा, दिग्दर्शक कबीर खान प्रचंड संख्येमध्ये कलाकारांची विविध शहरातून या कार्यक्रमास हजेरी होती, या प्रसंगी अपर्णा शहा संस्थापित अभियान ईपीआर टीम, यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत राजदूत यांनी पोहचून हा जनजागृतीचा संदेश कलाकार आणि प्रेक्षकापर्यंत पोहचवण्यात यश आले. ज्या प्रकारे आज आपण एक दिवस अश्या जलोशा मध्ये आपण साजरा करतोय, उत्साहात याचा आनंद घेत आहोत, त्याचं पद्धतीत आपण संपूर्ण आयुष्य जर खाणे खेळणे वाचणे या वर भर दिला तर जीवन उत्सव होईल असा ईपीआर च्या माध्यमातुन जमलेल्या सर्व तरुण पिढीला आणि कलाकारांना संदेश दिला. त्याचप्रमाणे सर्व शारीरिक आणि मानसिकरित्या अजून प्रगल्भ विचार आचार करणे अत्यंत गरजेचे आहे. खाणे, खेळणे, वाचणे हे जीवनात किती महत्वाचे आहे हे देखील पोहचवले. सर्व उपस्थित युवा आणि प्राप्त स्थळी उपस्थित प्रेक्षक आणि कलाकारांपर्यंत हा जनजागृतीचा आवाज पोहोचवण्यास ईपीआर टीमला यश आले.

# परिणीता सोशल फाऊंडेशनचा परिणीता सन्मान पुरस्कार सोहळा लवकरच

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

परिणीता सोशल फाऊंडेशन या संस्थेचा परिणीता सन्मान हा पुरस्कार सोहळा मार्च २०२५ मध्ये आयोजित करण्यात येत आहे. या पुरस्काराचे हे चौथे वर्ष असून या पुरस्कारासाठी अर्ज मागवण्यात येत आहेत. परिणीता सन्मान या पुरस्कारासाठी खालील विभागातून अर्ज करू शकता. वैद्यकीय (किमान ५ वर्ष अनुभव, स्वतःचे क्लिनिक असल्यास प्राधान्य) ज्योतिष तज्ज्ञ (किमान 5 वर्ष कार्यरत असणे आवश्यक) सीए (किमान 5 वर्षांचा अनुभव, कार्यरत असणे आवश्यक) वकिल (किमान 5 वर्षांचा अनुभव, कार्यरत असणे आवश्यक) आर्किटेक्ट (किमान 5 वर्षांचा अनुभव, कार्यरत असणे आवश्यक) रियल इस्टेट (स्वतःची फर्म असल्यास प्राधान्य) शिक्षण (किमान 5 वर्षांचा अनुभव, कार्यरत असणे आवश्यक) हॉटेल व्यवसाय (स्वतःचे हॉटेल असल्यास प्राधान्य) घरगुती उत्पादने (किमान 5 वर्षांचा अनुभव, स्वतःचे उत्पादन आवश्यक) कापड व्यवसाय (स्वतःचे वर्कशॉप / शोरूम असल्यास प्राधान्य) ज्वेलरी व्यवसाय (स्वतःचे शोरूम असल्यास प्राधान्य) फॅशन डिझायनिंग (किमान 5 वर्षांचा अनुभव, कार्यरत असणे आवश्यक) ब्युटी पार्लर (किमान 5 वर्षांचा अनुभव, स्वतःचे पार्लर असल्यास प्राधान्य) पायलट (किमान 5 वर्षांचा अनुभव, कार्यरत असणे आवश्यक) या विभागातून प्रत्येकी तीन नामांकनं घोषीत होणार असून त्यापैकी एकाला यावर्षीचा परिणीता सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. परिणीता कला सन्मान हा घोषीत पुरस्कार विभाग आहे. यात खालील विभागातून अर्ज करू शकता. अभिनेत्री (किमान 5 वर्षांचा अनुभव, व्यावसायिक महिला कलाकार ) मॉडेल (ब्रँड अँबेसिडर्स असल्यास प्राधान्य) नर्तिका (विशारद परीक्षा उत्तीर्ण आवश्यक, व्यावसायिक असणाऱ्यांना प्राधान्य) गायिका (विशारद परीक्षा उत्तीर्ण आवश्यक, व्यावसायिक असणाऱ्यांना प्राधान्य) महिला लेखिका (किमान 5 वर्षांचा अनुभव, व्यावसायिक लेखिकांना प्राधान्य) निर्माति-दिग्दर्शिका (किमान 5 वर्षांचा अनुभव, व्यावसायिक असणाऱ्यांना प्राधान्य) राजकारणी महिला (किमान 5 वर्षांचा अनुभव, कार्यरत असणे आवश्यक) पोलीस अधिकारी (किमान 5 वर्षांचा अनुभव, कार्यरत असणे आवश्यक) शासकीय अधिकारी (किमान 5 वर्षांचा अनुभव, कार्यरत असणे आवश्यक) वृत्तनिवेदिका (किमान 5 वर्षांचा अनुभव, कार्यरत असणे आवश्यक) महिला एन्फ्लुएन्सर (1M Followers Required). या विभागांसाठी मानांकनं जाहीर होणार नाहीत तर आलेल्या अर्जातून थेट पुरस्कार घोषित होणार आहेत. या पुरस्कारासाठी अर्ज करणारी महिला परिणीता सोशल फाऊंडेशनची सदस्या असणे बंधनकारक आहे. ज्या महिला सदस्य नाहीत आणि त्यांनी पुरस्कारासाठी अर्ज करण्याआधी सदस्य व्हावं. परिणीता सोशल फाऊंडेशनची वार्षिक सभासद फी यावर्षी पासून 600/ रुपये आहे. ज्या व्यावसायिका या पुरस्कारासाठी अर्ज करणार आहेत त्याच्याकडे त्यांच्या व्यवसायासंबंधीत अधिकृत कागदपत्रे असणे अनिवार्य आहे. पुरस्कारासाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख 10 मार्च 2025 आहे. त्यानंतर येणारे अर्ज स्वीकारता येणार नाहीत. पुरस्कारासाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या उद्योजिकांनी त्वरीत परिणीता सोशल फाऊंडेशन - **+91 9619949843 प्रसाद हनुमंते +91 7666327009 किंवा वेदांग सागवेकर - +91 8850121548 या संपर्क क्रमांकावर व्हॉटस अप मेसेज करावा.**




## कोकण रेल्वे महामार्गावर रसायनी जवळील सारसई गावच्या हद्दीत रेल्वेची धडक बसून एक इसम ठार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल आनंद पवार:** कोकण रेल्वे महामार्गावरील रसायनी पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या सारसई गावाजवळ एका ६२ वर्षीय इसमाला रेल्वेची धडक बसल्याने गंभीरित्या जखमी होऊन मयत झाल्याची दुर्दैवी घटना दि.१ मार्च रोजी घडली याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, पनवेल तालुक्यातील केळवणे आदिवासी वाडीत वास्तव्यास असलेले साखरे ईक्या पवार (वय६२) हे वीट भट्टीवर कामाला होते.ते रेल्वे रुळावरून चालत जात असताना सारसई गावच्या हद्दीतील रेल्वे पटरीवर इलेक्ट्रिक पोल नं.८६/४३ व ८५/४१ च्या दरम्यान अज्ञात रेल्वेची धडक बसून ते गंभीरित्या जखमी होऊन बाजूला पडले होते.सदर घटनेची माहिती मिळताच रसायनी पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत जखमी अवस्थेत असलेल्या साखऱ्या पवार ला औषधोपचार करिता चौक येथील ग्रामीण रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.सदर घटनेची रसायनी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू र.नं.१२/२०२५बी.एन.एस.एस.१९४ अन्वये नोंद करण्यात आली असून अधिक तपास रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवलदार सुरेश पवार हे करीत आहेत.

## होरायझन अकॅडमी निफाड शाळेचे विद्यार्थिनी डॉ.होमी बाबा बालवैद्यनिकीय स्पर्धेत उत्तीर्ण ...

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**



मराठा विद्या प्रसारक समाज संचलित होरायझन अकॅडमी निफाड या शाळेतील इयत्ता 9 वी ची विद्यार्थिनी लबधी निलेश छाजेड इयत्ता 6 वी वेदिका मयूर जाधव ,आणि स्वरा संदीप भाबड या विद्यार्थिनी ग्रेटर बॉम्बे सायन्स असोसिएशन अंतर्गत डॉ.होमी बाबा बालवैद्यनिकीय स्पर्धेत ची अत्यंत कठीण परीक्षा यशस्वी रित्या उत्तीर्ण झालेल्या असता .या विद्यार्थिनीचा सत्कार संस्थेचे सभापती माननीय बाळासाहेब क्षीरसागर साहेब व शाळेच्या मुख्याध्यापिका स्नेहल सोनवणे मॅम यांनी केला.तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# 'ग्रीन बिल्डिंग' उत्कृष्टतेप्रती आपली बांधिलकी अपोलोने कायम जपली

### अपोलोने रुग्णालयात पाणी, ऊर्जेची बचत, सामग्री, कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात सस्टेनेबल प्रथांचा समावेश केला

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई,वार्ताहर**

४ मार्च २०२५: अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने पर्यावरण शाश्वततेचे एक प्रमाण ही आपली ओळख मजबूत करत, आपल्या इमारतींचे डिझाईन, बांधकाम दृष्टिकोन, संचालन व देखरेख पैलूंच्या संदर्भात सस्टेनेबल प्रथांचा समावेश केला आहे, ज्यामुळे या इमारती 'ग्रीन बिल्डिंग' बनतात. 'ग्रीन बिल्डिंग' ती असते जी पारंपरिक इमारतींच्या तुलनेमध्ये पाण्याचा उपयोग कमी करते, ऊर्जा बचत करण्याच्या क्षमतेला जास्तीत जास्त वाढवते, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करते, कचरा कमी प्रमाणात निर्माण होतो आणि त्या इमारतींचा वापर करणाऱ्यांसाठी एक निरोगी स्थान प्रदान करते. 'ग्रीन बिल्डिंग' बनवण्यासाठी बांधकाम आणि त्यानंतरचे संचालन व देखरेख या दोन्हींमध्ये एका व्यापक दृष्टीकोनाची आवश्यकता असते. अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने आपल्या इमारतींमध्ये आर्किटेक्चरल डिझाईन सुविधा, पाणी आणि ऊर्जेची बचत करण्याची क्षमता, सामग्री, कचऱ्याचे व्यवस्थापन, इनडोअर हवेची गुणवत्ता, इमारतींचा उपयोग करणाऱ्यांसाठी थर्मल कम्फर्ट आणि इतर पर्यावरणात्मक पैलूंवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. 'ग्रीन बिल्डिंग' सामान्य इमारतींपेक्षा वेगळी दिसत नाही पण तिचे संचालन आणि देखरेख पैलूंमध्ये फरक असतो. अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईच्या इमारती बांधल्या जाणाऱ्या वेळेपासूनच पर्यावरणावर सकारात्मक प्रभाव निर्माण करण्यासाठी व्यवस्थित नियोजन करण्यात आले आहे. श्री तुलसीनाथन एस, जनरल मॅनेजर-मेंटेनन्स, अपोलो




हॉस्पिटल्स नवी मुंबई म्हणाले,"सस्टेनेबिलिटी हा आमच्या संचालनाचा एक भाग आहे, कुशल प्रकाश व्यवस्था, एयर कंडिशनिंग सिस्टिम, मोटर आणि पंपमार्फत ऊर्जेचा वापर कमी करण्यापासून, व्हर्जिन सामग्रीच्या ऐवजी रिसायकल्ड आणि रियुज्ड सामग्रीचा समावेश करण्यापर्यंत, प्रत्येक ठिकाणी आम्ही सस्टेनेबिलिटीची काळजी घेतो. आम्ही रेनवॉटर हार्वेस्टिंग आणि कुशल प्लम्बिंगमार्फत २६६०३८ केएल पाण्याची बचत केली आहे, स्मार्ट लायटिंग, HVAC आणि इन्व्हलप इफिशियन्सीमार्फत ४५७८३ MWh ऊर्जेचे संवर्धन केले आहे आणि नूतनीकरणीय ऊर्जा व कार्यक्षमता उपायांचा वापर करून ५४.७ M+Kg कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन रोखले आहे. कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी आम्ही करत असलेल्या प्रयत्नांनी दर दिवशी २५० किलोग्रॅम कंपोस्टरचा उपयोग करून ९७० टन जैविक कचऱ्याला डायव्हर्ट केले आहे आणि आम्ही विषाणुरोधी सरफेस कोटिंग्स आणि हाय इफिशियन्सी एयर फिल्टरेशनसह संसर्ग नियंत्रण सुनिश्चित करतो. याखेरीज आम्ही लँडफिलचे प्रमाण कमी करण्यासाठी कॅप्टिव्ह पॉवर जनरेशन तैनात करतो आणि जिथे कचरा निर्माण होतो तिथेच तो वेगवेगळा करतो. सस्टेनेबिलिटीसाठी आमची वचनबद्धता संरक्षणापेक्षा मोठी आहे, आम्ही सर्वांसाठी एक निरोगी आणि अधिक सस्टेनेबल भविष्य बनवण्यासाठी वचनबद्ध आहोत." अशा इमारती ग्राहकांकडून निर्माण केल्या जाणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन, पाणी बचतीची क्षमता, वाहतुकीमध्ये जीवाष्म इंधनाचा कमी वापर, ऊर्जा बचत करण्याची क्षमता आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण यासारख्या राष्ट्रीय मुद्द्यांचे निवारण करण्यात मदत करू शकते. सर्वात महत्त्वाची बाब अशी आहे की, या इमारती याठिकाणी काम करणाऱ्या, त्यांचा वापर करणाऱ्यांचे आरोग्य, आनंद आणि कल्याण यांना प्रोत्साहन देते.

## सोयाबीन उत्पादक शेतकरी 5000 च्या अनुदानापासून दोन वर्षापासून वंचित!

### शासनाने तातडीने अनुदान शेतकऱ्यांना द्यावे. रणजीत सिंह ठाकुर

**दैनिक युवक आधार**
**रिसोड**

रिसोड तालुक्यातील सन 2022- 23 मध्ये अतिवृष्टी झाली. त्यामध्ये कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने प्रति हेक्टरी पाच हजार याप्रमाणे अनुदान जाहीर केले होते हे अनुदान ईपिक पाहणी, नोंदणी अंतर्गत केलेल्या शेतकऱ्यांना जाहीर करण्यात आले होते. परंतु शासनाने शेतकऱ्यांना सरसकट अनुदान देण्यात यावे. अशी मागणी असंख्य शेतकऱ्यातर्फे मागणी होत आहे असे असतांनाही शासन याकडे जाणून-बुजून दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे अनेक शेतकरी अनुदानापासून वंचित राहिले आहेत. त्यासाठी अनुदान तात्काळ शेतकऱ्याच्या खात्यात जमा करण्यात यावे.महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांनी शेतकऱ्याच्या राहिलेल्या अनुदानाकडे लक्ष देऊन ईपीक पाहणी द्वारे नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना शासनाने जाहीर केल्याप्रमाणे अनुदान तात्काळ खात्यामध्ये वितरित करण्यात यावे. शेतकऱ्यांमध्ये शासन व प्रशासनाविषयी नाराजी पसरली असून शेतकऱ्यांनी ईपीक नोंदणी करूनही त्यांना अनुदान प्राप्त झाले नाही. अशा शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान जमा करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा व महसूल प्रशासन व कृषी विभाग हे असे सांगतात की शासन जोपर्यंत शासनाकडून पैसे येत नाहीत तोपर्यंत आम्ही काही करू शकत नाही त्यामुळे शेतकऱ्यांची खूप वाईट अवस्था झाली. असून शेतकऱ्यांनी ईपीक पाहणी ऑनलाईन नोंदणी झाली ,तरीही अद्याप अनुदान प्राप्त झाले नसल्याने शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. शेतकरी पूरता वैतागलेला असतांना शासन शेतकऱ्याकडे खरोखर लक्ष देत नाही. असा सर्व शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. तरी लवकरात लवकर सन 2022- 23 चे सोयाबीन कापसाचे अनुदान खात्यात जमा होईल ही आशा ठेवून शेतकरी जगत आहे.



# गुन्हे शाखा कक्ष 2 पनवेलने सराईत गुन्हेगाराला केले जेरबंद ; सहकारी पसार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, वार्ताहर**

घरफोड्यांसह इतर अनेक गुन्हे ज्यांच्या नावावर असलेल्या एका टोळीतील सराईत गुन्हेगाराला गुन्हे शाखा कक्ष 2 पनवेलच्या पथकाने पाठलाग करून पकडले असले तरी त्याचे इतर साथीदार पसार झाल्याने त्यांना जेरबंद करणे हे पोलिसांसाठी मोठे आवाहन ठरणार आहे. पनवेल परिसरात घरफोडी व अन्य काही गुन्ह्यातील काही संशयित आरोपी हे दरोडा टाकण्याच्या उद्देशाने वाशीत असल्याची माहिती गुन्हे शाखा परिमंडळ दोनच्या युनिटला मिळाली. या माहितीच्या आधारावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गवळी यांच्या नेतृत्वाखाली सपोनि प्रवीण फडतरे, पोउनि.मानसिंग पाटील, माधव इंगळे, पो.हवा.रमेश शिंदे, अनिल पाटील, मधुकर गडगे, रणजित पाटील, दिपक



डोंगरे, इंद्रजित कानू, रुपेश पाटील, सागर रसाळ, अजित पाटील, पो.शि.विक्रांत माळी आदींचे पथक तात्काळ वाशीतील मिनी सी शोर परिसरात दाखल झाले. संशयित एका गाडीत असल्याचे समजताच या गाडीचा पाठलाग पोलिसांनी सुरू केला. पोलिसांची चाहूल लागताच या संशयितांनी गाडी सागर विहार कडे वळवली. मात्र रस्ता माहिती नसल्याने सेक्टर आठ येथील नर्सरीकडे वळवली पुढे रस्ता बंद आहे. नेमके त्याच्या गाडीच्या स्टेअरिंग रॉड तुटल्याने गाडी एका ठिकाणी आदळली. त्यांना पोलिसांनी शरण येण्यास सांगितले. परंतु त्यांनी त्यांची तवेरा गाडी पोलीस पथकाच्या अंगावरुन घालून त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे त्या भागातील इतर दोन खाजगी वाहनांना धडक मारुन त्या गाड्यांचे नुकसान केले व त्या संशयितांनी येथील गर्द कांदळवनाचा आधार घेत पळून गेले. मात्र पोलिसांनी थेट जंगलात घुसून शोध मोहीम सुरू केली. यासाठी ड्रोन कॅमेराचे साहाय्य घेण्यात आले. मात्र गर्द झाडी आणि ड्रोन कॅमेराच्या सीमा असल्याने फारसे हाती लागले नाही. तसेच घटनास्थळी श्वान पथक दाखल झाले होते. व त्यांनी या टोळीतील सराईत गुन्हेगार परमजित पोमण सिंग उर्फ नागेश नागराज (43 रा.पंजाब) याला ताब्यात घेतले असून त्याच्यावर पंजाबसह डायघर पोलीस ठाणे, पार्क साईट पोलीस ठाणे मुंबई सायन पोलीस ठाणे, आर.ए.के.मार्ग पोलीस ठाणे मुंबई, जलालाबाद पोलीस ठाणे आदी ठिकाणी गुन्हे दाखल आहेत. तसेच त्याचे सहकारी सरदार (पूर्ण नाव माहित नाही), नेपाली थापा (पूर्ण नाव माहिती नाही), हसन (पूर्ण नाव माहित नाही), नेपाली (पूर्ण नाव माहित नाही) व हसन याचा मित्र (पूर्ण नाव माहित नाही) अशा एकूण 5 जणांचा शोध सुरू केला आहे. दरम्यान या गुन्ह्यात वापरणारी लाल रंगाची तवेरा गाडी तसेच गाडीमध्ये स्क्रु ड्रायव्हर, पक्कड, कटावणी, लोखंडी रॉड, हायड्रोलिक कटर, रस्सी बंडल, गोणपाटाच्या गोणी, मोठ्या पिशव्या, हॅण्डग्लोज, कैचीचे पाते, 03 मिरची पुडची पाकीटे असे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे.

## स्व.संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या, पाटोदा कडकडीत बंद

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांना अमानुषपणे मारहाण करतानाचे व्हिडिओ आरोपीने काढल्यानंतर ते व्हिडिओ सीआयडीने रिकव्हर करीत त्या मधील स्क्रीन शॉट चार्जशीटला जोडले आहेत. आता हे स्क्रीन शॉट माध्यामांच्या हाती लागले असुन ते फोटो माध्यमांनी प्रकाशित केल्यानंतर सर्वसामान्य माणसांचे मन हेलावून गेले असुन संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला आहे. संतोष देशमुखांचा अमानुष छळ करून मृतदेहाची विटंबना केल्याने जनसामान्यांत संतापाची लाट उसळली आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे क्रूर पद्धतीचे फोटो समोर आल्या नंतर दिनांक ०४ मार्च रोजी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आलेली होती. या बंदला प्रतिसाद देत पाटोदा तालुका कडकडीत बंद ठेवून छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालयावर निषेध मोर्चा काढण्यात आला व तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. या निषेध मोर्चात समाज बांधवाकडुन आक्रमक होऊन प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा तपास पूर्ण झाल्या नंतर सीआयडीने आरोपपत्र सादर केले. या आरोपपत्रात संतोष देशमुख यांच्या हत्येच्या वेळी आरोपींनी काढलेले व्हिडिओ आणि फोटो देखील आहेत. त्यातून अत्यंत क्रूर पद्धतीने संतोष देशमुख यांचा छळ करून त्यांना मारण्यात आल्याचे बघायला मिळत आहे. हे सगळे फोटो सोशल मिडियावर व्हायरल झाल्यानंतर आज पाटोदा बंदची हाक देण्यात आली होती. त्याच पार्श्वभूमीवर पाटोदा शहरात आज समाज बांधवांनी आक्रमक होत बाजारपेठ बंद केल्ली. व्यापाऱ्यांनी दिवसभर आपली दुकाने बंद ठेवून कडकडीत बंद पाळला. याा वेळी जोरदार घोषणाबाजी करत सर्व आरोपींना फाशीची शिक्षा करण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली.



## शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख शिरिष घरत यांच्या बहिणीचे निधन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, दि.4 (वार्ताहर)**



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख रायगड पनवेल शिरीष नारायण घरत यांची बहीण सौ. शीला (बेबीताई) पद्माकर पाटील यांचे नुकतेच निधन झाले. त्यांचा दशक्रिया विधी तीर्थक्षेत्र नाशिक येथे दि. 10/03/2025 रोजी होणार आहे व त्यांचे उत्तर कार्य (अकरावे) राहत्या घरी बेलपाडा खारघर दि. 11/03/2025 रोजी होणार आहे.

## पुणेकरांसोबत मिळून मिसळून मराठी भाषा शिका, - पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी,

**दैनिक युवक आधार**
**पुणे वार्ताहर**

होली मिलन समारोह रंगोली फागण आयो रे या कार्यक्रमांमध्ये दरम्यान बोलत होते, शिवराणा फाउंडेशन च्या वतीने होली मिलन समारोह आणि राजस्थानी लोकगीते व नृत्यचा आकर्षण कार्यक्रम स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा रंग मंच मध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाले, या कार्यक्रमाचे उद्घाटन पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले, यावेळी जितेंद्र डुडी म्हणाले राजस्थानी फार भावुक होतात राजस्थानमध्ये हिंदी बोलतात पण महाराष्ट्रातील राजस्थानी समाज मराठी भाषा शिकले पाहिजे कारण इथल्या माणसांबरोबर मिळून मिसळून भेटून मराठी भाषा शिकले पाहिजे, राजस्थानी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन या पुढे अशा प्रकारे चालू राहिले पाहिजे असे यावेळी सांगितले, याप्रसंगी राजस्थानी समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांचा शाल पुष्पगुच्छ राजस्थानी फेटा आणि स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला, यावेळी प्रमुख पाहुणे सूर्यदत्ता एज्युकेशन फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष डॉ संजय चोरडिया, भाजपा पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे, विधान परिषद सदस्य योगेश टिळेकर, अतिरिक्त आयुक्त (प्रशासकीय) अरविंद चावरिया, राजस्थानी समाजाचे अध्यक्ष मगराज राठी, सामाजिक कार्यकर्त्या नीना ओसवाल, आदि यावेळी उपस्थित होते, कार्यक्रमाचे आयोजन शिवराणा फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष सुखदेवसिंह चारण, बिश्नोई ट्रॅव्हल्सचे नारायण डारा, यांनी केले होते यावेळी राजस्थानी समाजातील होली मिलन समारोह रंगोली फागण आयो रे या कार्यक्रमांमध्ये राजस्थानी कलाकार संगीताच्या कार्यक्रमांमध्ये नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली हा कार्यक्रम बघण्यासाठी पुणे शहरातून राजस्थान समाज बांधव आपल्या परिवारासोबत मोठ्या संख्येने उपस्थित होते



## पसोडी ग्रामपंचायत कार्यालयात डॉ संतुजी रामजी लाड जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी ज्ञानेश्वर कुं निकाळजे**
**वरूड / जाफ्राबाद**

जालना जिल्हातील जाफ्राबाद तालुक्यातील पासोडी ग्रामपंचायत कार्यालयात हिंदु खाटीक समाज भूषण सत्यशोधक समाजाचे अग्रदूत डॉ. संतुजी रामजी लाड यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ संतुजी रामजी लाड यांच्या प्रतिमेचे पुष्प हार अर्पण करण्यात आले यावेळी उपस्थित सरपंच चंदन ताटू ग्रामपंचायत सदस्य सुरेश खंदाडे, रामेश्वर रावळकर ग्रामपंचायत सदस्य व हिंदू खाटीक समाज तालुका अध्यक्ष, झामसिंग रेकनोत, देवसिंग रेकनोत माजी सरपंच,पुरण ताटू, गोविंद माकोडे,शंकर रावलकर ता. उपध्यक्ष ,समाधान कल्याणकर, राजू रावळकर, प्रल्हाद रावळकर, संतोष रावळकर, आदी गावकरी मंडळी व हिंदू खाटीक समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# साहेब मुख्य रस्ते झाडून काय होणार ?

## घाटंजी शहरातल्यतील वॉर्डतील कचरा व नाल्या अजूनही तुंबलेल्याच जनसामान्याचा मुख्यधिकारी यांना सवाल

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**

घाटंजी -घाटंजी नगरपरिषदचे मुख्यधिकारी यांनी स्वच्छ शहर आणि सुंदर शहर ही संकल्पना राबवून नव्याने आलेल्या मुख्यधिकारी यांनी आपला पदभार सांभाळल्यापासुन घाटंजी शहरातील मुख्य रस्तेची स्वच्छतेचे अभियान मुख्यधिकारी यांनी राबवीत घाटंजी शहर स्वच्छ ठेवण्याचा विडा उचलत आपल्या कृती तुन स्वतःहा साफ सफाई करत घाटंजी शहर स्वच्छ देखिल ठेवले परंतु वॉर्डा वॉर्डात व गल्ली बोळात असलेल्या नाल्या अजून देखिल तुडुंब अश्या भरलेल्या असून मुख्यधिकारी यांचे दुर्लक्ष वार्डातील तुंबलेल्या नाल्या कडे होत आहे सोबतच कचरा संकलनाचे कंत्राट हे ७७लक्ष रुपयाचे देऊन देखिल स्वतःहा मुख्यधिकारी यांना साफ सफाई करण्याकरिता व कचरा उचलण्या करिता रस्त्यावर उतरावे लागत आहे. अशी जन भावना सामान्यातुन ऐकण्यास मिळत आहे. नवप्रहार सकाळ या व्हाट्स अँप समूहात पत्रकारने तुंबलेल्या नाली व कचरा संबंधी प्रश्न करताच कचरा संकलन कंत्राटदारा कडून मिळाले तुम्हाला आता जाग आली का? तुम्ही झोपी गेले होते का? अश्या प्रकारचे उत्तर

१मार्च रोजी नवप्रहार सकाळ या व्हाट्स अँप ग्रुपवरील पत्रकार फरहान मुसानी या पत्रकार बांधवाने यांच्या वॉर्डातील कचरा आणि नालीत सचलेल्या कचऱ्या संबंधी मजकूर टाकताचं त्यांना कचरा कंत्राटी कडून उद्धट असे उत्तर देत "तुम्ही लेखी तक्रार द्या आणि आता तुम्हाला जाग आली का?तुम्ही आता पर्यंत झोपी गेले होते का? असे मुजोरीची भाषा वापरीत उत्तर मिळाले या समूहात पत्रकार बांधव,मुख्यधिकारी व प्रत्येक शासकीय अधिकारी सामील आहे आणि नेहमीच हा कंत्राटदार कुठलीही समस्या समूहात टाकली की नेहमीच याचे असे मुजोरीचे वागने आणी हेकेखोरपणा पाहाव्यास मिळत असतो अजून पर्यत यावर मुख्यधिकारी यांनी या कंत्राटदारस लगाम लावली नाही असे समजल्या गेले आहे खरं तर नगर परिषद जनतेकडून कर आकारणी करते आणि ते पण सक्तीनिशी कर आकारणी करत असते आणि त्या कराच्या आकारणीतून मानवीसेवेसाठी त्याची वसुली देखिल होते त्या मध्ये नियमित वॉर्डातील नाली सफाई, नियमित कचरा घंटा गांडीची सुविधा अश्या खूप सुविधा कराच्या आकारणीतून या सुखसुविधा मिळत असते एखाद्या पत्रकारणे सर्वजनिक समस्या एखाद्या समूहात टाकली तर यात गैर का? आणि या आधी प्रभारी मुख्यधिकारी यांनी या कंत्राटदाराला हद्दपार केल्या नंतर देखिल

**साहेब मुख्य रस्ते झाडून काय होणार? घाटंजी शहरातल्यतील वॉर्डतील कचरा व नाल्या अजूनही तुंबलेल्याच जनसामान्याचा मुख्यधिकारी यांना सवाल**

घाटंजी -घाटंजी नगरपरिषदचे मुख्यधिकारी यांनी स्वच्छ शहर आणि सुंदर शहर ही संकल्पना राबवून नव्याने आलेल्या मुख्यधिकारी यांनी आपला पदभार सांभाळल्यापासुन घाटंजी शहरातील मुख्य रस्तेची स्वच्छतेचे अभियान मुख्यधिकारी यांनी राबवीत घाटंजी शहर स्वच्छ ठेवण्याचा विडा उचलत आपल्या कृती तुन स्वतःहा साफ सफाई करत घाटंजी शहर स्वच्छ देखिल ठेवले परंतु वॉर्डा वॉर्डात व गल्ली बोळात असलेल्या नाल्या अजून देखिल तुडुंब अश्या भरलेल्या असून मुख्यधिकारी यांचे दुर्लक्ष वार्डातील तुंबलेल्या नाल्या कडे होत आहे सोबतच कचरा संकलनाचे कंत्राट हे ७७लक्ष रुपयाचे देऊन देखिल स्वतःहा मुख्यधिकारी यांना साफ सफाई करण्याकरिता व कचरा उचलण्या करिता रस्त्यावर उतरावे लागत आहे. अशी जन भावना सामान्यातुन ऐकण्यास मिळत आहे. नवप्रहार सकाळ या व्हाट्स अँप समूहात पत्रकारने तुंबलेल्या नाली व कचरा संबंधी प्रश्न करताच कचरा संकलन कंत्राटदारा कडून मिळाले तुम्हाला आता जाग आली का? तुम्ही झोपी गेले होते का? अश्या प्रकारचे उत्तर

१मार्च रोजी नवप्रहार सकाळ या व्हाट्स अँप ग्रुपवरील पत्रकार फरहान मुसानी या पत्रकार बांधवाने यांच्या वॉर्डातील कचरा आणि नालीत सचलेल्या कचऱ्या संबंधी मजकूर टाकताचं त्यांना कचरा कंत्राटी कडून उद्धट असे उत्तर देत "तुम्ही लेखी तक्रार द्या आणि आता तुम्हाला जाग आली का?तुम्ही आता पर्यंत झोपी गेले होते का? असे मुजोरीची भाषा वापरीत उत्तर मिळाले या समूहात पत्रकार बांधव,मुख्यधिकारी व प्रत्येक शासकीय अधिकारी सामील आहे आणि नेहमीच हा कंत्राटदार कुठलीही समस्या समूहात टाकली की नेहमीच याचे



असे मुजोरीचे वागने आणी हेकेखोरपणा पाहाव्यास मिळत असतो अजून पर्यत यावर मुख्यधिकारी यांनी या कंत्राटदारस लगाम लावली नाही असे समजल्या गेले आहे खरं तर नगर परिषद जनतेकडून कर आकारणी करते आणि ते पण सक्तीनिशी कर आकारणी करत असते आणि त्या कराच्या आकारणीतून मानवीसेवेसाठी त्याची वसुली देखिल होते त्या मध्ये नियमित वॉर्डातील नाली सफाई, नियमित कचरा घंटा गांडीची सुविधा अश्या खूप सुविधा कराच्या आकारणीतून या सुखसुविधा मिळत असते एखाद्या पत्रकारणे सर्वजनिक समस्या एखाद्या समूहात टाकली तर यात गैर काय?आणि या आधी तत्कालीन प्रभारी मुख्यधिकाऱ्यांनी या कंत्राटदारास कायमचे हद्दपार केले होते परंतु संबंधीतानी नव्याने रुजू करून कंत्राट देखिल दिल्याचे समजते...

# राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत

## आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी वेधले शासनाचे लक्ष वेधले

दैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी)

राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधले.

राज्यातील राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना दरमहा ७ तारखेपर्यंत वेतन न मिळणे, महागाई भत्याच्या फरकाची थकबाकी, वार्षिक वेतनवाढ फरक, घरभाडे भत्ता, सुधारीत महागाई भत्ता इ. लागू करणे, कोविड भत्ता, मेडिक्लेम कॅशलेस, शिस्त व आवेदन पद्धतीत बदल करणे, शासनाने राज्य परिवहन महामंडळाला स्वमालकीच्या बसेस देणे इ. राज्य परिवहन महामंडळाचे विविध प्रश्न प्रलंबित असल्याचे डिसेंबर २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे. महामंडळातील कर्मचाऱ्यांचे पीएफ आणि ग्रॅज्युएटीचे दोन स्वतंत्र ट्रस्ट असून ८९ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेली भविष्य निधीची रक्कम गत १० महिन्यापासून ट्रस्टमध्ये जमा न केल्यामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या पीएफचे ११०० कोटी आणि उपदानाचे १००० कोटी असे एकूण २१०० कोटी रुपये प्रलंबित असल्याचे जानेवारी २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, परिणामी कर्मचाऱ्यांना हक्काची रक्कम काढण्यास अडचणी निर्माण होत असून या प्रलंबित अडचणींमुळे कर्मचाऱ्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसदर्भात वेळोवेळी लोकप्रतिनिधींनी, कर्मचारी व अधिकाऱ्यांनी, विविध संघटनांनी मा. परिवहन मंत्री महोदयांकडे निवेदन दिली असून या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांची सर्व थकित देयके व मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे, अशी विचारणा तारांकित प्रश्नाद्वारे करत एसटी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समस्या आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी शासन दरबारी मांडल्या. या संदर्भात राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी लेखी उत्तर दिले असून त्यांनी दिलेल्या उत्तरात म्हंटले कि, मा. औद्योगिक न्यायालयातील याचिकेत आदेशित केलेल्या नुसार राज्य परिवहन महामंडळाला वेतन प्रदान अधिनियम १९३६ लागू होत असल्यामुळे त्यामधील प्रावधान अन्वये दरमहा १० तारखेपर्यंत वेतन अदा करता येते असे त्यामध्ये नमूद असून त्यानुसार वेतन अदा करण्यात येते. राज्य शासनाने गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीच्या अहवालानुसार महागाई भत्याच्या थकबाकीबाबत महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारल्यानंतर सदर थकबाकीबाबत महामंडळाने निर्णय घेण्याचे समितीने निर्देश दिले आहेत, त्यानुसार राज्य परिवहन महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारल्यानंतर राज्य परिवहन महामंडळ स्तरावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल, अशी नामदार प्रताप सरनाईक यांनी माहिती दिली. तसेच राज्य परिवहन महामंडळाने २६४० स्वमालकीची नवीन तयार बसेस महामंडळाच्या वाहन ताफ्यात जमा करण्याचे ठरविले असून मार्च २०२५ पर्यंत प्राप्त होणाऱ्या ५०० वाहनांपैकी २०४ वाहने प्राप्त झालेली असून विभागांना वाटप करण्यात आलेली आहेत. एसटी कर्मचाऱ्यांचे, अधिकाऱ्यांचे पीएफ आणि ग्रॅज्युएटीची रक्कम, भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळास व उपदान निधी विश्वस्त मंडळास २२१४.४७ कोटी अदा करणे बाकी आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना हक्काची रक्कम काढण्यास अडचणी निर्माण होत असल्याची बाब खरी आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसदर्भात वेळोवेळी लोकप्रतिनिधींनी, कर्मचारी व अधिकाऱ्यांनी, विविध संघटनांनी निवेदन दिली असून प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने एसटी कर्मचा-यांच्या मागण्यांसदर्भात बैठका घेण्यात आलेल्या आहेत. बैठकीमध्ये तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार दि.०१.०४.२०२० रोजीच्या मूळ वेतनामध्ये ६५०० रुपयांची वाढ करून वेतन निश्चिती केलेली आहे. तसेच दि.०४.१०.२०२३ रोजीच्या गठीत करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीने सादर केलेल्या अहवालानुसार रापमची आर्थिक स्थिती सुधारल्यानंतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वार्षिक वेतन वाढीचा दर इतरच्या फरकाची रक्कम अदा करण्याबाबत राज्य परिवहन महामंडळ स्तरावर निर्णय घेण्यात येईल, असेही नामदार प्रताप सरनाईक यांनी लेखी उत्तरात सांगितले आहे.

# शिवसेनेचे माजी रायगड जिल्हा प्रमुख दिनेश पाटील यांना मातृशोक

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील**

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे माजी जिल्हा प्रमुख तथा जेएनपीए बंदराचे विश्वस्थ दिनेश पाटील यांच्या मातोश्री मनोरमा काशिनाथ पाटील यांचे वयाच्या 92 व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्यामुळे जसखार गावासह संपूर्ण उरण तालुक्यात दुःखाचे सावट पसरले आहे. उरण-जसखार येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी जसखार गावांतील ग्रामस्थांसह पंचक्रोशितील नागरिक, विविध राजकीय पक्षाचे नेते जेएनपीए चे कामगार,अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्याकाळी परिसरात स्वतच्या मालकीचा वडलोपरजीत मिठाचा मोठाव्यवसाय असल्याने कशिनाथ पाटील यांच्या बरोबर त्यांचा विवाह झाल्या नंतर त्याजरी मोठया ऐश्वर्यात राहत असल्या तरी त्यांचे राहणीमान साधे



असून विचार सरणीउच्च होती त्याकाळी मनोरमाताई शिक्षित असल्यानेत्यांनी काही काळ विद्यार्थ्यांसाठी ज्ञानार्जनाचे कामही केले त्याच बरोबरीने आपल्या सर्व मुलांना उच्चशिक्षितही केले. हसतमुख मनमिळाऊ स्वभाव. दातृत्वाची ईश्वरी देणगी, वात्सल्य गरजूंना मदत करण्याची त्यांची नैतिकता त्यामुळे त्या जनमानसात लोकप्रिय होत्या,जीवनात ऐश्वर्य आणि सघर्ष अशा प्रवाहातही त्यांनी समाजाप्रती आपली आपुलकी जपली होती. त्यांच्या निधनाने उच्च संस्काराच्याशाळेचे पर्व संपले, पण हेसारे संस्कारत्यांनी आपल्या मुलांदेऊन समाज्यात एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे.वयाच्या 92 व्यावर्षी वृद्धापकाळाने निधन झाले आहे, त्यांच्या निधनाने उच्च संस्काराची व विचाराची जी पोकळी निर्माण झाले आहे ती भरून न येण्या सारखी आहे. त्यांच्या पश्चात मुले-मुली-जावई-नातवंडे असा मोठा परिवार आहे.शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर रविवार दि.2मार्च रोजी उरण-जसखार येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. असून 11 मार्च रोजी श्रीक्षेत्र माणकेश्वर उरण-केगाव येथे त्यांचे सकाळी 8;00 वाजता तर दिवस कार्य बुधवार दि.13 मार्च रोजी जसखारयेथील त्यांच्या निवासस्थानी होणार आहेत. या प्रसंगी कोणत्याही प्रकारचा दुखवटा स्वीकारला जाणार नसल्याचे पाटील परिवारकडुन सांगण्यात आले आहे.

# पनवेलकरांना भेडसावणाऱ्या नागरि समस्येबाबत काँग्रेस पक्षाचे महानगरपालिकेविरोधात धरणे आंदोलन

दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर)

पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये अनेक दिवसापासून अनेक समस्या नागरिकांमध्ये भेडसावत आहेत. या समस्यांविरोधात आज काँग्रेस पक्षाने पनवेल महानगरपालिका कार्यालयाजवळ धरणे आंदोलन करून प्रशासनाचा निषेध केला आहे. पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटी जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील यांच्या नेतृत्वाखाली आज हे आंदोलन छेडण्यात आले होते. या आंदोलनात महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष कॅप्टन कलावत, पनवेल शहर जिल्हा युवक अध्यक्ष हेमराज म्हात्रे, तालुकाध्यक्ष नंदराज मुंगाजी, जेष्ठ नेते शशिकांत बांदोडकर, मा.नगरसेविका शशिकला सिंग, निर्मला म्हात्रे, शहराध्यक्ष लतीफ शेख, अरुण कुंभार, आदम दलाईत, जयेश लोखंडे, शाहीद मुल्ला आदींसह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी पनवेल महानगरपालिका तसेच




राज्य सरकारविरोधात निषेधार्थ घोषणा देण्यात आल्या. पनवेल महानगरपालिका सर्वसामान्य नागरिकांसाठी पिण्याचे पाण्याचा प्रश्न ही प्राथमिकता असून त्यासाठी आपण काय उपाययोजना करणार आहात तसेच खारघर, कळंबोली, कामोठे, तळोजा, खांदा कॉलनी, नवीन पनवेल या शहरामध्ये जेवढे एमएलडी पाण्याची गरज आहे त्याहून कमी पाणी का सोडले जाते या संदर्भात आपण माहिती द्यावी व उपाययोजना करावी, अशी मागणी केली. तसेच पनवेल महानगरपालिका क्षेत्रात निकृष्ट नाले व रस्त्याची निपक्षपाती पणे चौकशी करावी व निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकादारांवर चौकशी करून कारवाई करण्यात यावी. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात गेली अनेक वर्ष वाढीव मालमत्ता करा संदर्भात अनेक मोर्चे निघून सुद्धा कोणत्याही प्रकारचे नागरिकांचे समाधान झालेले नाही तरी आपण या विषयावर मा. मुख्यमंत्री महोदय, नगरविकास मंत्री महोदय यांच्या समवेत संयुक्त बैठक आयोजित करून कायमस्वरूपी या मुद्दा निकाली काढण्यात यावा. त्याचप्रमाणे नोकर भरतीमध्ये पनवेलकरांना प्राधान्य मिळत नाही अशी तक्रार जनतेकडून वारंवार येत आहे तरी पनवेलकरांना महापालिका क्षेत्रातील विविध नोकर भरतीत प्राधान्य द्यावे व रोजगार उपलब्ध करून द्यावा. अर्थसंकल्पात महिला/ शिक्षण / आरोग्यासाठी भरीव तरतूद न केल्याने नाराजी व्यक्त केली. प्रधानमंत्री घरकुल आवास योजना ही एस. आर.ए योजेनेप्रमाणे राबवावी. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दिव्यांग बांधवांसाठी रोजगार उपलब्ध करून द्यावा. अशी मागणी यावेळी काँग्रेस पक्षातर्फे करण्यात आली आहे.कॉग्रेस पक्षाची मागणी आहे. तरी या विषयांवर आपणाकडून योग्य ती कार्यवाही व्हावी ही विनंती.

## शिवसेनेतर्फे देण्यात आली पनवेलमधील महापालिका शाळांसाठी सॅनिटरी पॅड वेंडिंग मशिन्स

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांची लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ ही ओळख पुढे घेऊन जाण्यासाठी पनवेलमध्ये महानगरप्रमुख तथा माजी नगरसेवक अड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांच्या कल्पनेतून व नेतृत्वात पनवेल शिवसेनेने महापालिकेच्या 11 शाळांमधील गरीब व गरजू विद्यार्थिनींना त्यांच्या आरोग्यासाठी आवश्यक असणारी सॅनिटरी पॅड्स ची व्हेंडिंग मशिन्स दान केली आहेत. या शाळांमध्ये शिकणाऱ्या अति सामान्य किंवा गरीब गरजू कुटुंबातील मुलींना त्यांच्या मासिक धर्मात आवश्यक असणारी सॅनिटरी पॅड्स आता शाळांमध्येच मोफत मिळणार आहेत. पनवेल महापालिकेच्या अधिकारी स्वप्नाली चौधरी यांनी ही मशीन्स उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते त्यांच्या निवासस्थानी स्वीकारली. एकनाथ शिंदे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले व ते एवढ्यावरच न थांबता अशाप्रकारे पनवेल शिवसेनेने हा नवीन पायंडा घालून दिला असून हे 'पनवेल मॉडेल' म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात राबवण्यात येईल, सर्व महापालिकांमध्ये तसे आदेश देऊन अशी मशीन्स सर्व शाळांमध्ये बसवण्यात येतील असेही सांगितले तर पनवेल शिवसेनेला हा उपक्रम इतर भागातही सुरू ठेवण्यासाठी ताबडतोब रुपये दहा लाखांची वैयक्तिक मदतही एकनाथ शिंदे यांनी जाहीर केली. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रथमेश सोमण यांच्यासह उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, महानगर संघटक मंगेश रानावडे, उपमहानगरप्रमुख महेश सावंत यांनी संयुक्त प्रयत्न केले तर उपक्रम यशस्वी करण्यासाठी शिवसेना महिला आघाडी यांनी कंबर कसली. यावेळी पनवेल शिवसेनेच्या संघटनात्मक बाबींवर देखील शिंदे यांचे सोबत चर्चा झाली तर पुढील महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने आवश्यक त्या तयारी करण्याच्या सूचनाही एकनाथ शिंदे यांनी सोमण यांना दिल्या.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

## औरंगजेबचा फोटो स्टेटस ठेऊन धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्याला अटक करुन केली येरवडा जेलमध्ये रवानगी

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

दि. 02/03/2025 रोजी बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीत पोलीसांना गोपनीय बातमीदार मार्फत मिळालेल्या माहितीनुसार,एका इसमाने आपल्या व्हाट्सअप स्टेटस वर औरंगजेबाचा फोटो ठेवून त्यावर धार्मिक तेढ निर्माण होईल असा आक्षेपार्ह मजकूर ठेवला आहे. सदरच्या माहितीच्या अनुषंगाने लगेच हामीद अमीर खान वय ३१लोंढेवस्ती,गुनवडी,बारामती आणि शाहेबाज अस्लम खान वय २१,रा.कुरकुंभ ता.दौंड यांना पोलीस स्टाफच्या मार्फत ताब्यात घेऊन त्याच्या मोबाईलची तपासणी केली असता त्यावर गोपनीय माहितीचे अनुसार औरंगजेबाचा फोटो व आक्षेपार्ह मजकूर " किंग ऑफ इंडिया बादशाह औरंगजेब अलमगीर ३ मार्च १७०७" असा मजकूर मिळून आला. अश्या कृत्यामुळे धार्मिक तेड निर्माण होऊन बारामती शहर हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरिता पोलीस निरीक्षक,विलास नाळे, बारामती शहर पोलीस स्टेशन यांनी त्याचे विरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 127 प्रमाणे प्रस्ताव तयार करून तो मा.अप्पर पोलीस अधीक्षक सो बारामती यांना सादर केला असता यावर सुनावणी घेऊन सदर इसमाची कृती ही धार्मिक तेढ निर्माण करणारी असल्याची खात्री झाल्याने,प्रतिबंधक उपाययोजना म्हणून,त्याची रवानगी येरवडा मध्यवर्ती कारागृह पुणे येथे करण्यात आली आहे. बारामती शहर पोलीस स्टेशनकडून बारामती शहरातील वेगवेगळ्या सोशल मीडिया साइडवर,तसेच नागरिक ठेवत असलेल्या व्हाट्सअप स्टेटसवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून त्या माध्यमातून कोणत्याही धर्मा विरुद्ध तेढ निर्माण करणाऱ्या इसमांवर यापुढे देखील उचित कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. सध्या छत्रपती संभाजी महाराज बलीदान मास तसेच मुस्लीम बांधवांचा पवित्र रमजान मास चालु असून आगामी काळात हिंदू व मुस्लिम समाजाचे उत्सव येणार असून सदर उत्सवांच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचे आक्षेपार्ह असे स्टेटस किंवा अफवा पसरवणाऱ्या मजकुराचा संदेश कोणत्याही धर्माच्या इसमाने कोणत्याही धर्मा विरुद्ध सोशल मीडियावर शेअर करू नये असे आवाहन नागरीकांना करण्यात येत आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक,पुणे ग्रामिण श्री.पंकज देशमुख.मा.अपर पोलीस अधीक्षक बारामती,श्री.गणेश बिरादार,मा.उपविभागीय पोलीस अधिकारी बारामती श्री.सुदर्शन राठोड.यांचे मार्गदर्शनाखाली बारामती शहर पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

## कुरूळा शिवपार्वती मंदिर येथे अखंड शिवनाम सप्ताहचे आयोजन.

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी :प्रशांत ढवळे.**

प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही कुरुळ्यात 26फेब्रुवारी ते 5 मार्च दरम्यान अखंड शिवनाम सप्ताह व महाशिवरात्री महोत्सव होणार असून डॉ. वीरूपाक्ष शिवाचार्य मुखेडकर,आचार्य गुरुराज स्वामी अहमदपूरकर, श्री गुरु राजशेखर शिवाचार्य अहमदपूरकर,श्री गुरु अभिषेक शिवाचार्य हाडोळतीकर महाराज यांची उपस्थिती रहाणार असून त्यांचे आशिर्वचन होणार आहे. दररोज शिवपाठ गाथा भजन व शिवजागर,परमरहस्य ग्रंथावर प्रवचन होणार आहे तसेच या दरम्यान मान्यवर महाराजाचे कीर्तन होणार आहे या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आव्हान येथील वीरशैव भजनी मंडळ समस्त गावकरी मंडळ शिवपार्वती मंदीर विश्वस्त मंडळ यांनी केले आहे.



# २०३० पर्यंत ५०० दशलक्ष लोकांमध्ये श्रवणशक्ती कमी होण्याची शक्यता - जागतिक आरोग्य संघटनेने दिला इशारा

### जागतिक श्रवण दिनानिमित्त खारघरच्या मेडिकवर हॉस्पिटलने केली बहिरेपणा आणि कॉक्लियर इम्प्लांटसंबंधी जनजागृती

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई :** दरवर्षी 03 मार्च रोजी जगभरात जागतिक श्रवण दिवस साजरा केला जातो. यानिमित्ताने मेडिकवर हॉस्पिटलने लहान मुलांमधील बहिरेपणा आणि कॉक्लियर इम्प्लांटवर जनजागृती करणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. लहान मुलांमधील श्रवण क्षमता कमी होण्याच्या वाढत्या घटनांमुळे, या कार्यक्रमात श्रवण क्षमता कमी होण्याच्या घटना रोखण्यासाठी वेळेवर उपचार करण्याचा सल्ला देण्यात आला. याठिकाणी आयोजित उपक्रमात नवी मुंबई- इंडियन असोसिएशन ऑफ पीडियाट्रिक्सच्या अध्यक्षा डॉ. मंगाई सिन्हा यांच्यासह इतर ऑडिओलॉजिस्ट, नर्सिंग स्टाफ आणि रोटरी सदस्य असे सुमारे ५० व्यक्तींनी सहभाग नोंदविला. त्यांच्याकरिता याठिकाणी शैक्षणिक सत्राचे आयोजन करण्यात आले होते. लहान मुलांमधील श्रवणक्षमता कमी होणे, त्याचे परिणाम आणि प्रगत उपचार पर्यायांबद्दल त्यांना शिक्षित करणे हा या उपक्रमाचा मुळ उद्देश होता. जागतिक आरोग्य संघटनेच्या




(WHO) मते, २०३० पर्यंत, ५०० दशलक्षाहून अधिक लोकांमध्ये श्रवणक्षमता कमी होण्याची शक्यता आहे यासाठी विशेष खबरदारी घेणे गरजेचे आहे. श्रवणशक्ती कमी होणे यास अनेक घटक कारणीभूत ठरतात. दिर्घकाळासाठी मोठ्या आवाजात वावरणे, कानाचे पडदे फाटणे, संसर्ग, कानात मेण जमा होणे, अनुवांशिकता, वृद्धत्व तसेच ओटोस्क्लेरोसिस, मधल्या कानाचा आजार आणि डोक्याला दुखापत यासारख्या काही वैद्यकीय परिस्थितींचा समावेश आहे. परंतु लहान वयातील बहिरेपणा हा एक चिंतेचा विषय ठरत आहे. मेडिकवर हॉस्पिटल प्रतिबंधात्मक उपाय आणि सहभागासाठी कॉक्लियर इम्प्लांट आणि प्रगत ऑडिओलॉजी केअर व आधुनिक उपचारांवर प्रकाश टाकण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले. सल्लागार ईएनटी आणि एंडोस्कोपिक सर्जन डॉ. राजेंद्र वाघेला सांगतात की, १००० पैकी अंदाजे ३ ते ६ मुले जन्मतःच बहिरेपणासारख्या समस्येने पिडीत असतात. यामुळे संवादात अडथळे निर्माण होऊन त्यांना संभाषण साधता न येणे,बोलणे न समजणे आणि दैनंदिन कामांमध्ये सहभागी होणे देखील कठीण होते. कालांतराने, यामुळे सामाजिक अलगाव निर्माण होऊ शकतो, कारण निराशेमुळे किंवा लज्जेमुळे अशा व्यक्ती संवादांपासून दूर जाऊ शकतात. ऐकू न येणारी मुले बोलायला शिकणार नाहीत आणि ते बहिरेपणाबरोबरच आणि मूक्याचेही शिकारी ठरतात. ते अपंग होतात आणि त्यांच्या जीवनाच्या प्रत्येक पैलूवर त्यांना असंख्य आव्हानांना तोंड द्यावे लागते. त्यांना शिकण्याच्या आणि कमाईच्या समान संधी मिळत नाहीत. वेळीच निदान आणि वैद्यकीय उपचार ही गुंतागुंत रोखण्यासाठी महत्त्वाची आहे. जन्माच्या वेळी ओएई (OAE) चाचणी आणि गरज पडल्यास बेरा (BERA) चाचणी करुन श्रवण क्षमता तपासता येते आणि कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेद्वारे पुढील उपचारांमध्ये याची मदत होते. डॉ. राजेंद्र वाघेला पुढे सांगतात की, आमचे रुग्णालय अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्रगत उपचार पद्धतींनी सुसज्ज आहे, ज्यामुळे रुग्णांना सर्वोत्तम उपचार मिळतील याची खात्री आहे. नाविन्यपूर्ण ऑडिओलॉजिकल मूल्यांकनांपासून ते अत्याधुनिक कॉक्लियर इम्प्लांट आणि श्रवणयंत्रांपर्यंत, आम्ही रुग्णांच्या श्रवणदोषाच्या विविध स्तरांसाठी तयार केलेले उपचार पुरवितो. श्रवण प्रशिक्षण आणि स्पीच थेरपीसह आमचे व्यापक पुनर्वसन उपचार रुग्णांना श्रवण उपकरणांशी जुळवून घेण्यास, त्यांच्या संवाद क्षमतेवर आत्मविश्वास परत मिळविण्यास आणि संपुर्ण जीवन जगण्यास मदत करतात. शिवाय, स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने गरजूंना कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया मोफत पुरविली जाते. प्रत्येकाचे श्रवण आरोग्य चांगले रहावे यासाठी आम्ही जनजागृती करतो आणि उच्च-स्तरीय वैद्यकीय सेवा प्रदान करतो असे मेडिकवर हॉस्पिटल्सचे केंद्र प्रमुख डॉ. माताप्रसाद गुप्ता यांनी स्पष्ट केले.

## सिल्लोड उपविभाग -२ येथे राष्ट्रीय लाईनमन दिन साजरा



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:-** वीज वितरण व्यवस्थेतील महत्त्वपूर्ण घटक असलेल्या लाईनमन बद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी केंद्र सरकारने 4 मार्च रोजी देशात लाईनमन दिवस साजरा करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्या अनुषंगाने सिल्लोड तालुक्यात हा दिवस उत्साहात साजरा करून जनमित्र (लाईनमन) यांचा सन्मान करण्यात आला. सिल्लोड उपविभाग -२ येथे पार पडलेल्या या समारंभास कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. अविनाश राऊत साहेब (कार्यकारी अभियंता, सिल्लोड) , उपकार्यकारी अभियंता श्री. सचिन परदेशी, सहाय्यक अभियंता भिमराव कडेल , नवजीत माडे, केशव गोसावी, अभिजीत बोबडे, श्रीमती स्वाती ढगे यांच्यासह लाईनमन पंडित आहेर, सुनिल कड, सुरेश आगे, विनोद नवगिरे, मुकीम पठाण, राहुल आव्हाड, सागर गिरी, रमेश पांढरे, सचिन वाघ, सुनील सहाने, विठ्ठल बावस्कर, आदींची उपस्थिती होती. यावेळी लाईनमन पंडित आहेर यांच्याशी संवाद साधल्यानंतर त्यांनी सांगितले की, आमच्या कामात चूक करून चालत नाही. लाईनमनला घर, कुटुंब आणि वैयक्तिक अडचणी बाजूला ठेवून एकाग्रतेने काम करावे लागते. कोणत्याही वेळी कामासाठी तयार रहावे लागते. विज बिल वसुलीपासून तांत्रिक समस्या सोडवण्यापर्यंत ग्राहक आणि आमचा थेट संपर्क होतो. ग्राहकांनी वेळेत विज बिल भरून सहकार्य करावे', असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## तळा तालुका क्रिकेट असोसिएशन आयोजित टी.टी.सी.ए मानाचा चषक २०२५ संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,(केतन भोज**

);रायगड जिल्ह्यातील तळा तालुका क्रिकेट असोसिएशन आयोजित टी.टी.सी.ए मानाचा चषक २०२५ मानसरोवर मैदान नवी मुंबई येथे शनिवार दि.०२ मार्च आणि रविवार दि.०३ मार्च रोजी असोसिएशनचे अध्यक्ष पांडुरंग पाटील आणि कार्याध्यक्ष राजेश पेलनेकर व इतर सर्व कार्यकारिणी यांच्या अथक परिश्रम आणि मेहनत घेऊन ही स्पर्धा संपन्न केली.एकूण ३२ संघाने या स्पर्धे मध्ये सहभाग घेतला होता.यावेळी प्रथम क्रमांक के.सी.सी बोईस बेलघर रोख रुपये ४४'४४४/- तसेच चषक,द्वितीय क्रमांक साई कृपा क्रिकेट क्लब गिरने रोख रुपये २२,२२२/- तसेच चषक,तृतीय क्रमांक कालभैरव क्रिकेट संघ अडनाले रोख रुपये ११,१११/तसेच चषक आणि चतुर्थ क्रमांक ओमसाई क्रिकेट संघ तळा रोख रुपये ७,७७७/तसेच चषक या संपूर्ण स्पर्धेमध्ये शिस्तबद्ध संघ म्हणून साई कृपा क्रिकेट क्लब गिरने या संघाला गौरवण्यात आले.मलिकावीर - अजय पाशीलकर गिरने,उत्कृष्ठ गोलंदाज - साहिल चोरगे,ओमसाई तळा,उत्कृष्ट फलंदाज - यश के.सी. सी बेलघर,सामनावीर - प्रकाश बेलघर.या स्पर्धेचे



सूत्रसंचालन सचिवभरत नाडकर यांनी केले.आणि लाईव्ह प्रेक्षपण रविंद्र कावजी याशिवाय स्पर्धेचे पंच -मनोज भगत,एकनाथ घांगरूम,प्रवीण भौड,यशवंत भगत,दिनेश पेलणेकर,जयवंत बालबा,भालचंद्र धाकम,नितेश महाडिक, रमेश नाडकर,रामदास फकीर,तीसरे पंच -सखाराम राऊत आणि पांडूरंग तांदलेकर आणि समालोचक - पांडूरंग पाटील,राजेश पेलनेकर,सुरेश शिंदे,संतोष पवार,स्कोर - नथुराम घाग,कु.लक्ष्मण बुवाजी,नामदेव बुवाजी,कुणाल मंचेकर. मैदानवर सर्व सुख-सुविधा जितेंद्र कदम,खजिनदार केतन खूटिकर,हेमंत सनस,योगेश सपकाल,विठोबा भात्रे,समीर पारावे आणि गणेश निवाते यांनी पार पाडली.

# नाशिकमध्ये नागरीकांच्या सतर्कतेमुळे जनावराचे

### मांस वाहतूक करणारा कंटेनर सह ८० लाखांचा मुद्देमाल जप्त चालक अटकेत

युवक आधार निफाड
नाशिक राहुल कुलकर्णी

नाशिक मधील मुंबई-आग्रा महामार्गावर मोठ्या प्रमाणात गोमांस वाहतूक होत असल्याचे समजताच पोलिसांनी कारवाई करत वातानुकूलित कंटेनरमधून ८० लाख ११ हजार ५०० रुपयांचे जनावराचे मांस जप्त केले. तसेच, कंटेनर चालकाला अटक करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या कारवाईत पोलिसांनी ८०,११,५०० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यात ६५,११,५०० किमतीचे १४४७ बॉक्स व १५,००,००० किमतीचा अशोक लेलँड कंपनीचा कंटेनर MH 46 AR 0797 यांचा समावेश आहे. नाशिक येथील नागरीक बजरंग दलाचे सतर्क कार्यकर्ते विजय चव्हाण हे आपल्या दुचाकीवरून जात असताना गरवारे रोडजवळ महामार्गावर एक मोठा कंटेनर उभा असल्याचे त्यांच्या लक्षात आले. कंटेनरखाली पाणी साचले होते. आणि त्यातून उग्र वास येत असल्याने त्यांनी संशय व्यक्त करून चालकाकडे चौकशी केली. मात्र, चालकाने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्यांनी तात्काळ पोलिसांना कळवले.एमआयडीसी पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. पंच व शासकीय पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कंटेनरची तपासणी करण्यात आली. यावेळी कंटेनर वातानुकूलित असल्याचे आढळले. त्यात एकावर एक ठेवलेली एकूण १,४४७ कार्टून्स सापडली. काही बॉक्स उघडून पाहिल्यावर त्यामध्ये जनावराचे मांस असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी नमुने गोळा करून न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडे पाठवले आहेत. चालक दुर्गेश पन्नालाल जैस्वाल (वय २५, रा. उरण, नवी मुंबई) याने सदर माल मालेगाव येथून भरल्याचे आणि तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई येथे पोहोचवायचा असल्याचे सांगितले. मात्र, त्याच्याकडे कोणतेही अधिकृत दस्तऐवज, परवाने किंवा बिल नव्हते. त्यामुळे पोलिसांनी संपूर्ण माल जप्त केला आणि चालकाला अटक केली. या प्रकरणी कलम 325, 3(5) सह




महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम 5(अ), 5(क), 9(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शेवाळे करत आहेत. या घटनेमुळे नाशिकमध्ये जनावराचे मांस वाहतुकीचा मोठा रॅकेट सक्रिय असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी सखोल तपास करावा अशी मागणी गोरक्षकांनी केली आहे.यावेळी राष्ट्रीय बजरंग दलाचे कार्यकर्ते, विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्या सह हिंदुत्ववादी संघटनाचे शेकडो नागरीकांनी जय श्रीराम च्या घोषणा देत कार्यवाही करण्यास भाग पाडले.



## जालना जिल्हा उपाध्यक्षपदी माजी नगरसेवक फारुक भाई कुरेशी याची निवड

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- ज्ञानेश्वर कुं निकाळजे**
**वरूड/ जाफ्राबाद**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजित दादा पवार साहेब यांचे अत्यंत विश्वासू राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार लोकनेते अरविंद अण्णा चव्हाण साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून जाफराबाद शहरातील माजी नगरसेवक माननीय फारुख भाई कुरेशी यांची जालना जिल्हा उपाध्यक्षपदी निवड.. आमचे स्नेही मित्र एडवोकेट विनोद जी डींगे साहेब यांची जाफराबाद न्यायालय वकील संघाच्या तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा जिल्ह्याच्या वतीने येथोचित सत्कार.. माजी नगरसेवक तथा उद्योजक माननीय बाळू भाऊ हिवाळे यांची जाफराबाद उपाध्यक्षपदी निवड.. आमचे स्नेही मित्र एडवोकेट विधीतज्ञ सचिन साहेबराव सोरमारे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्ष प्रवेशासह कार्याध्यक्ष जाफराबाद पदी निवड करण्यात आली

यावेळी जाफ्राबाद तालुका अध्यक्ष दत्तू पाटील अंभोरे साहेब , माणिकराव पाटील वायाळ.. सर्व पदाधिकारी मान्यवरांचे राष्ट्रवादीमय हार्दिक अभिनंदन पुढील राजकीय भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छ.,.

## सन ऑफ आंबेडकर ग्रुपचे सनी गायकवाड यांना समाजरत्न पुरस्कार जाहीर...

**दैनिक युवक आधार**
**परतुर- जालना(अशोक ठोके)**



महाराष्ट्र मध्ये फुले शाहू आंबेडकरी चळवळीमध्ये काम करणाऱ्या सर्व सामाजिक कार्यकर्त्यांना महाराष्ट्रातील सर्वांचे परिचित भंते कश्यपली यांच्यावतीने रविवार दि.30 मार्च 2025 रोजी पारेगाव तालुका जिल्हा जालना येथे दोन दिवसीय धम्म परिषदेचे औचित्य साधून सनी गायकवाड यांना समाजाप्रती प्रामाणिक काम केल्याबद्दल तसेच फुले शाहू आंबेडकरी चळवळीत व सन ऑफ आंबेडकर ग्रुप परतुर च्या वतीने विविध गोरगरीब वंचित घोषित घटकातील नागरिकांचे कामे मार्गे लावल्याबद्दल तसेच समाजासाठी अहोरात्र झटल्याबद्दल त्यांना भंते कश्यपली यांच्या हस्ते समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे या पुरस्काराबद्दल सनी गायकवाड यांनी आदरणीय भन्ते कश्यपली यांचे मनापासून आभार मानले,तसेच हा समाजरत्न पुरस्कार घोषित झाल्यानंतर त्यांनी पुढे असे म्हटले की मानसन्मान हा विकत घेता येत नसतो समाजाप्रती ग्राउंड लेव्हलला काम केल्यानंतर नक्कीच असे सन्मान मिळत असतात यापुढेही समाजाप्रती तसेच बाबासाहेबांच्या चळवळीसाठी रात्रंदिवस निस्वार्थी काम करण्याचे बळ मिळालं आहे यापुढेही चळवळीचे काम जोमात करण्याचा निर्धार त्यांनी केला आहे.

## सिपीएस ऑलिम्पियाड परीक्षेत वैनतेय विद्यालयाच्या समीक्षा गायकवाडला सुवर्णपदक प्राप्त

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

निफाड सिपीएस ऑलिम्पियाड परीक्षेत निफाड येथील वैनतेय विद्यालयाची विद्यार्थिनी समीक्षा सतीश गायकवाड हिने सुवर्णपदक प्राप्त केले आहे या परीक्षेसाठी विद्यालयाचे 106 विद्यार्थी बसले होते इयत्ता पाचवीचा 1 , सातवीचे 4, आठवीचे 28 ,नववीचे 54 , दहावीचे 19 असे एकूण 106 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते या परीक्षेचा निकाल 100 टक्के लागला सामान्य ज्ञान या विषयात इयत्ता 8 वी ची विद्यार्थिनी समीक्षा गायकवाड या विद्यार्थिनीने सुवर्णपदक मिळवले या विद्यार्थ्यांना संतोष ससाणे, श्रीमती सरिता पवार यांचे मार्गदर्शन लाभले न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे यांच्या हस्ते समीक्षा गायकवाड या विद्यार्थिनीचा सत्कार करण्यात आला याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त ,रतन पाटील वडघुले, विद्यालयाचे प्राचार्य बी.आर. सोनवणे, उपप्राचार्या मनीषा गुजराथी , पर्यवेक्षक गुलाब टकले, पर्यवेक्षक बा. बा. गुंजाळ , मार्गदर्शक शिक्षक संतोष ससाणे आदी उपस्थित होते यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, विश्वस्त अड. ल. जि. उगांवकर, रतन पाटील वडघुले, किरण कापसे, राजेंद्र राठी , अड. दिलीप वाघवकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे , मधुकर राऊत,विश्वास कराड, नरेंद्र नांदे, वैनतेय विद्यालयाचे प्राचार्य बी.आर.सोनवणे, उपप्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी , पर्यवेक्षक गुलाब टकले, पर्यवेक्षक बा. बा. गुंजाळ , गणित विभाग प्रमुख विनोद परदेशी यांनी अभिनंदन केलें.



**समीक्षा गायकवाड या विद्यार्थिनीचा सत्कार करतांना**
वि. दा. व्यवहारे व संस्थेचे विश्वस्त रतन पाटील वडघुले,सोबत विद्यालयाचे प्राचार्य बी.आर.सोनवणे, उपप्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी , पर्यवेक्षक गुलाब टकले, मार्गदर्शक शिक्षक संतोष ससाणे आदी

## नांदेड जिल्ह्याचे सुपुत्र व मातंग समाजाची चळवळ भारतीय लहुजी सेनेचे सरसेनापती मा.व्ही जी रेड्डी साहेब यांचं दुःखत निधन

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड -:** व्हि. जी.रेड्डी साहेब यांचे स्वाभिमानी, समाजाभिमुखी समर्पित भावनेने अन्याय अत्याचारा विरोधात प्रखड भुमीका मांडत समाजाला शोषणमुक्त, करण्यासाठी अन्यायाविरोधात लढा उभारण्या साठी समाजातील कार्यकर्ते निर्माण करून पहिल्यांदा जय लहुजी हा नारा घराघरात पोहचवून मातंग समाजाला जागृत करून अन्याया विरोधात बंड कसा करावा, त्यांच्या विरोधात पेटून उठण्यासाठी त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर मोर्चा, निषेध मोर्चेअंदोलने, वेळोवेळी शासन व प्रशासना विरोधात दंड थोपटवून



मा. व्ही. जी. रेड्डी (सेनाप्रमुख)

बंड करणारे व्यक्तिमत्व होते व हे संपूर्ण महाराष्ट्राला परिचित असणारं जहालमतवादी, वजनदार सामाजिक चळवळीचा मसिहा त्यांच्या नेतृत्वा मध्ये महाराष्ट्राच्या मातंग समाजाच्या चळवळीतील हजारो कार्यकर्त निर्माण होवून महाराष्ट्रा मध्ये सामाजिक चळवळ अधिक तिव्र गतीमान होवून क्रांतीचा अंगारा पेठविण्याची सुरुवात हि मा. रेड्डी साहेबांनी केली त्यांचे सामाजिक त्यांच्या विचाराचं जहालमतवादी वैचारिक जाज्वलं स्वाभिमानी, निडर, सामाजिक चळवळीला उर्जा देणारा नेता म्हणून रेड्डी साहेब यांचे योगदान महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीच्या इतिहासात सुवर्ण अक्षराने नोंदवले जाईल. साहेबा बदलची बातमी कानावर पडताच मी अत्यंत निशब्दःझालो. कारण महाराष्ट्राच्या चळवळीचं केंद्रबिंदु असणारा महान सामाजिक चळवळीचा जाणता प्रणेता होते त्यांनी हयातीमध्ये अनेक मोठ मोठ्या सभेतील त्यांचे सिंहासारखे गर्जना करणारे डरकाळी फोडणारे उमदे विचार आजही कानावर पडले की समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या शरीरातल रक्त हे क्रांतीच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी सळसळतं जाग होतं अशी त्यांची जहालमतवादी असणारी भुमीका अत्यंत जाणवत राहणारी आहे . असा समाजाचा नेता समाजाचा ढाण्या वा,मातंग समाजाची धडधडणारी संघर्षाची तोफ आज शांत झाली. असली तरी त्यांचे विचार त्यांची चळवळ ही जिवंत राहणारी आहे.त्यांना अत्यंत जडअंतकरणाने अखेरचा मानाचा क्रांतीकारी जय लहुजी साहेब आपणास

# सातार्‍यात काँग्रेसचे आंदोलन

## शेतकर्‍यांना कर्जमाफी, पीक उत्पादनाला हमीभाव देण्याची मागणी



**कराड :** जिल्ह्यातील शेतकर्‍यांच्या कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी सातार्‍यातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवारी काँग्रेसच्या वतीने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शेतकर्‍यांच्या कर्जमाफीच्या मागणीसोबत अत्याचार करणार्‍यांना फाशीची शिक्षा देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

आंदोलनात जिल्हाध्यक्ष डॉ. सुरेश जाधव, काँग्रेस ओबीसी विभाग प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी, जिल्हा सरचिटणीस नरेश देसाई, अजित पाटील, महाराष्ट्र युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष शिवराज मोरे, महिला जिल्हाध्यक्षा अल्पना यादव, धनश्री महाडिक, सुषमा राजेघोरपडे, अन्वर पाशा खान, संदीप माने, जगन्नाथ कुंभार आदी पदाधिकारी सहभागी झाले होते.

### या आहेत मागण्या

शासनाच्या चुकीच्या धोरणांमुळे शेतकर्‍यांवर संकट आल्याचा आरोप यावेळी काँग्रेस पदाधिकार्‍यांच्या वतीने करण्यात आला. तसेच विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनाप्रमाणे शेतकर्‍यांना कर्जमाफी मिळायलाच हवी, पीकविमा योजनेतील घोटाळ्याची चौकशी व्हावी, महिला आणि मुलींवरील अत्याचार वाढत असल्याने दोषींना फाशीची शिक्षा देण्यात यावी, शेतकर्‍यांच्या पीक उत्पादनाला हमीभाव देण्यात यावा, अशा विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या.



# नांदेडमध्ये पालिकेसमोर ठिय्या

**नांदेड :** शेतकर्‍यांना कर्जमाफी द्या, शेतमालाला हमीभाव द्या, यासह विविध मागण्यांसाठी सोमवारी राज्यभरासह नांदेडमध्ये देखील शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने नांदेड महापालिकेसमोर आंदोलन करण्यात आले.

खासदार रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत व उत्तर जिल्हाध्यक्ष बी. आर. कदम, दक्षिण जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

शेतकर्‍यांना कर्जमाफी द्या, शेतमालाला हमीभाव द्या, शेतीला अखंडित वीजपुरवठा करा, पीकविमा त्वरित शेतकर्‍यांच्या खात्यात जमा करा आदीसह मूलभूत सुविधा द्या, कचरा, रस्ते, पाणी, विद्युत पुरवठा आदी सुरळीत सुरू असाव्यात अशी मागणी यावेळी करण्यात आली. खासदार रवींद्र चव्हाण यांनी शेती प्रश्न आणि शहरातील मुलभूत सुविधा आदी समस्येकडे लक्ष वेधत केंद्र व राज्य सरकारवर जोरदार प्रहार केला. आंदोलनाचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन कार्याध्यक्ष बालाजी चव्हाण यांनी केले. यावेळी डॉ. श्रावण रेपनवाड, ॲड. सुरेंद्र घोडजकर, राजेश पावडे, केदार पाटील साळुंखे, जयश्री पावडे, शमिम अब्दुला आदींसह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मायक्रो फायनान्स कंपन्यांची दादागिरी संपुष्टात आणणार

## रत्नागिरीतील महिला मेळाव्यात निर्धार ; लाँग मार्च काढण्याचा इशारा

**रत्नागिरी :** मायक्रो फायनान्स कंपन्या, खासगी सावकारी यामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील महिलांचे प्रचंड आर्थिक शोषण होत आहे. परिणामी संबंधित महिलांवर आत्महत्येची वेळ आली असून गंभीर बाब म्हणजे वसूली एजंटांच्या जाचामुळे एका महिलेने आपले जीवन संपवले आहे. कंपन्यांची ही दादागिरी संपुष्टात आणण्यासाठी सरकारने वेळीच हस्तक्षेप न केल्यास हप्ताबंद आंदोलन सुरू करण्याबरोबर रत्नागिरी ते मंत्रालय असा महिलांचा लाँग मार्च काढण्याचा निर्धार रविवारी येथे पार पडलेल्या महिलांच्या एल्गार मेळाव्यात करण्यात आला. तसेच या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी विधिमंडळ अधिवेशनात हा विषय उपस्थित करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

जनता दल सेक्युलर आणि कोकण जनविकास समितीने मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या दादागिरीविरोधात रत्नागिरी शहरातील पटवर्धन हायस्कूलच्या सभागृहात रविवारी एल्गार मेळाव्याचे आयोजन केले होते. या मेळाव्यात यापुढे कोणताही अन्याय सहन न करण्याचा निर्धार महिलांनी व्यक्त केला.

मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या भरमसाट व्याजामुळे महिलांना जीवन नकोसे झाले आहे. अनेक महिलांचे मानसिक स्वास्थ्य बिघडले आहे. काही हजारांचे कर्ज दोन एक वर्षे व्याज भरूनही लाखांच्या घरात गेल्याने आता जगायचे कसे? असा आक्रोश करत काही प्रातिनिधिक महिलांनी मेळाव्यात आपल्या व्यथा मांडल्या. दागिने, जमिनी, बागा विकून कर्ज फिटत नसल्याने यापुढे आमचा संसाराचा गाडा चालवायचा तरी कसा असा प्रश्न उपस्थित केला गेला. रात्री अपरात्री घरात घुसून व्याज वसूल करणार्‍या एजंटांनी नियम, कायदे धाब्यावर बसवल्याची उदाहरणे महिलांनी दिली.

मायक्रो फायनान्स कंपन्या रत्नागिरी जिल्ह्यातील कर्जदार महिलांकडून मासिक २४ ते३६ टक्के व्याज वसूल करत आहेत. यामुळे संबंधित महिला आणि त्यांच्या कुटुंबीयांचे आर्थिक शोषण होत आहे. यातून महिलांची सुटका करण्यासाठी आता सरकारने पुढाकार घ्यायला हवा. यासाठी उर्वरित कर्जाची वसुली करण्यास मनाई करण्यात यावी. मुख्य म्हणजे कर्ज मंजूर करण्यासाठी केलेला करारनामा व अन्य कागदपत्रांच्या प्रती संबंधित महिलांना मिळाव्यात आणि कर्जाच्या रकमेतून केलेली १० टक्के कपात रद्द करून सदर रक्कम महिलांना परत करावी, अशी आग्रही मागणी मेळाव्याचे प्रमुख आयोजक आणि जनता दलाचे मुंबई अध्यक्ष प्रभाकर नारकर यांनी मेळाव्यात केली.

### उपजिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदन

कंपन्यांच्या या दादागिरीविरोधात रत्नागिरी जिल्ह्याच्या जिल्हाधिकारीपदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे उपजिल्हाधिकारी राहुल गायकवाड, तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांची भेट घेऊन शिष्टमंडळाने त्यांच्याशी चर्चा केली, त्यांना निवेदन दिले. यावेळी प्रभाकर नारकर, संजय परब, संग्राम पेटकर, संजीवकुमार सदानंद तसेच ज्योती तोडणकर, चेतना पेटकर, दीपाली शिवलकर आदी उपस्थित होत्या.

# डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे स्वच्छता अभियान



**अलिबाग :** अलिबागमधील रेवदांडा येथील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे महाराष्ट्र, दिल्ली, गोवा, गुजरात, कर्नाटक व मध्य प्रदेश या राज्यांतील काही भागांसह अमेरिका, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड या देशांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

### २२०७ किमी रस्ते केले स्वच्छ

या एकदिवसीय अभियानात एकूण २२०७ किमी रस्ते, ३५,२९,७८८ चौ.मी. सरकारी कार्यालये, रुग्णालये व इतर परिसर व ३१ कि.मी. समुद्रकिनारा स्वच्छ करण्यात आला. एकूण १,१८,१६० स्वयंसेवकांनी या स्वच्छता अभियानात सहभाग घेतला. या एकदिवसीय अभियानातून एकूण ३,४६८ टन ओला व सुका कचरा संकलित करण्यात आला. यावेळी जमा केलेला कचरा डम्पिंग ग्राऊंडपर्यंत नेण्यात आला.

## संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणातील आरोपींना फाशी व्हावी या मागणीसाठी घाटकोपर शिवसेना पश्चिम विधानसभा क्षेत्राच्या वतीने आंदोलन



**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर,(केतन भोज);** बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील हादरवणारे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आणि सर्वच स्तरांतून या फोटो नंतर हळहळ व्यक्त करण्यात आली.अतिशय अमानुष पद्धतीनं देशमुख यांना माराहाण करत असूरी वृत्तीनं आरोपींनी हा गुन्हा केला आणि त्याची छायाचित्र,व्हिडीओ सुद्धा काढले. या कृत्याचा निषेध समाजाच्या सर्व स्तरांतून केला जात असून,आता ही मन हेलावणारी दृश्य व्हायरल झाल्यानंतर सर्वच स्तरातून आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी होत आहे.तसेच शिवसेना घाटकोपर पश्चिम विधानसभा क्षेत्राच्या वतीने घाटकोपर अमृत नगर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक याठिकाणी संतोष देशमुख हत्याप्रकरणातील क्रूरकर्मा आरोपी वाल्मीक कराड याला फाशी व्हावी.तसेच या हत्याकांडात जे जे आरोपी आहेत व जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कायद्याद्वारे कठोरातील कठोर कारवाई व्हावी अशी मागणी करत निषेध म्हणून वाल्मीक कराड याच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करत आंदोलन करण्यात आले.यावेळी विधानसभा प्रमुख डॉ.सुबोध बावदाने,माजी नगरसेविका डॉ.भारती बावदाने,माजी नगरसेवक दिपक बाबा हांडे व घाटकोपर पश्चिम विधासभा क्षेत्रातील शिवसेनेचे असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# कोणत्याही क्षेत्रात यशासाठी कष्ट आवश्यक :- प्राचार्य डॉ. विश्वास कदम

## जय भवानी महाविद्यालय येथे पत्रकार महेश बेदरे यांचा गौरव



दैनिक युवक आधार
पाटोदा (प्रतिनिधी) - सध्याच्या आधुनिक जगात इतर क्षेत्रांप्रमाणे माध्यमिक क्षेत्रात देखील मोठे बदल घडत आहेत या पार्श्वभूमीवर अनेक नवनवीन माध्यमांचे प्रकार समोर येत असले तरी देखील प्रिंट मीडिया म्हणजेच वृत्तपत्रांची विश्वासार्हता आज देखील कायम आहे. पत्रकार महेश बेदरे यांनी नेहमीच विविधांगी सर्व प्रकारचे विषय आपल्या लेखणीतून सकारात्मक मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांना नुकताच राज्यस्तरीय मौलाना आझाद आदर्श पत्रकारिता पुरस्कार मिळाला आहे. होय त्यांनी मिळवलेल्या यशामागे निश्चितच मोठी मेहनत व कष्ट आहे त्याच प्रमाणे स्वतःमध्ये काळानुरूप सकारात्मक बदल करणे देखील तेवढेच आवश्यक आहे. कोणत्याही क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर त्यासाठी कष्ट हे आवश्यकच आहेत असे प्रतिपादन जय भवानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी केले. बीड जिल्हा पत्रकार संघाच्या पाटोदा तालुकाध्यक्षपदी पत्रकार महेश बेदरे यांची निवड झाल्याबद्दल तसेच त्यांना मौलाना आझाद राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल शनिवार दिनांक ०१ मार्च रोजी जय भवानी महाविद्यालय या ठिकाणी गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कदम होते तर प्रमुख अतिथी म्हणून पाटोदा न्यायालयाचे विधीज्ञ एडवोकेट सचिन जावळे, प्रभारी प्राचार्य प्रा. सोमनाथ घाडगे, प्रसिध्द नाटककार प्रा. बापू घोक्षे, कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा.सतिश जरांगे, प्रा.डॉ.सुनील जाधव, प्रा. डॉ.शौकत सय्यद, प्रा.डॉ.वंदन जाधव, यांच्या सह मान्यवरांची उपस्थिती होती. या वेळी बोलताना प्राचार्य डॉ.कदम म्हणाले की ग्रामीण भागात पत्रकारिता करत असताना आज माध्यमांसमोर व पत्रकारांसमोर देखील मोठी आव्हाने आहेत परंतु अशा परिस्थितीत समाजाचे वास्तव समाजाचा आरसा म्हणून सर्वांसमोर मांडण्याचे मोठे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत आहे. पाटोद्याच्या पत्रकारितेला देखील गौरवशाली इतिहास आहे व महेश बेदरे यांच्यासारख्या तरुण पत्रकाराकडून विश्वासाहर्ता जपली जात आहे हे देखील मोठे कार्य आहे. या पुढे देखील त्यांच्या लेखणीतून विविध सामाजिक प्रश्नांना वाचा फोडून या प्रश्नांना न्याय देण्यासाठी त्यांनी भूमिका घ्यावी व अशाच पद्धतीची सकारात्मक पत्रकारिता पुढे न्यावी आज त्यांना प्रतिनिधित्वाची देखील संधी मिळाली आहे ही देखील निश्चित गौरवाची व आनंदाची बाब आहे. असे डॉ.कदम यांनी या वेळी सांगितले. या प्रसंगी प्रभारी प्राचार्य सोमनाथ घाडगे, विधीज्ञ एडवोकेट सचिन जावळे, महेश बेदरे, सुनील जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी केले. आभार प्रा.डॉ.बंडू लोखंडे यांनी मानले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# दीन दु:खितांना मदत करा




रमजान महिन्यातील केले जाणारे प्रत्येक कार्य पुण्यप्राप्ती करुन देणारे,एकमेकांना सहाय्य करणारे,गोर गरीब,दीन दलित, अनाथ,विधवा गरजूंना मदत करणारे असते. समाजातील विविध घटकांच्या समस्यांची जाणिव रमजानच्या रोजातून होते.आपल्या आसपास जे लोक राहतात त्यापैकी काही गरीब आहेत,गरजू आहेत, कुणी आजारी आहेत, कुणाच्या घरात खायला नाही,कुणी अनाथ आहेत,बेसहारा आहेत, वृध्द आहेत अशा लोकांच्या विविध समस्या सोडविणारा कुणी नाही.अशा घटकांना सामाजिक जाणिव व माणुसकीच्या भावनेतून आपण मदत केली पाहिजे ही वृत्ती रोजामुळे निर्माण होते.भूकेची जाणिव होऊन भुकेल्याबद्दल सहानुभूती निर्माण होऊन अशा घटकांना मदत केली पाहिजे ही भावना उदयास येते. गरीबांना ही अन्न, पाणी, निवारा आवश्यक आहे, त्यांनाही कपडे दिले पाहिजे,आजारी रुग्णांना मदत केली पाहिजे अशा प्रकारच्या जाणिवा रोजा मुळे कळतात व त्यातूनच मदतीचा हात पुढे येतो.हजरत पैगंबरांनी समाजातील अशा घटकांना शक्य तेवढी मदत करण्याची शिकवण दिली आहे. भौतिक सुखाच्या मागे धावतांना आज माणुसकी व नातं लोप पावत आहे.भाऊ भावाला विचारीत नाही, ज्यांनी काबाडकष्ट करुन आपल्याला मोठे केले अशा मातापित्यांना न विचारणारे, त्यांच्याकडे दुर्लक्ष करणारे भरपूर लोक समाजात आहेत.अशा वेळी अशा घटकांना मदतीचा हात देण्याची गरज असते. रोजातून हीच भावना निर्माण होते.आपण प्रगतीची खूप शिखरं सर केली असली तरी अधोगतीच्या द-या देखील निर्माण केल्या आहेत.आई घरात मरुन पडली तरी देखील तिच्याकडे न पाहणारे किंवा अमेरिकेत मुलाला पाठविण्यासाठी अहोरात्र कष्ट करणारा बाप जेव्हा मेला तेव्हा त्या बापाच्या अंतिम संस्कारांसाठी वेळ नसणारा मुलगा आपल्या समाजाने अनुभवला आहे. प्रगती म्हणजे नात्यांचा विसर नव्हे तर नात्यांना सांभाळून पुढे जाण्याचा मार्ग म्हणजे प्रगती. ही वैचारिक शृंखला रोजा मुळे गुंफली जाते. व्यक्तींच्या समूहातून समाज अस्तित्वात येतो व आपले सुख दुःख हे समाजाचेही सुखदुःख असते.अशा वेळी आपण मदत केली पाहिजे ही शिकवण रोजा मधून मिळत असते.आपल्या सारखी तहान,भूक,थकवा, ग्लानी इतरांनाही आली असेल,जे आपल्याकडं आहे ते इतरांकडे असेल का ? हा प्रश्न मनात निर्माण होऊन मदतीची भावना निर्माण होते. समाजातील असे अनेक हात मदतीसाठी पुढे येतात व गरजू घटकांच्या गरजा पूर्ण होतात.प्रत्येक धर्मात अशा प्रकारची मदत करणारे हजारो हात परमेश्वराने निर्माण केले आहेत व ते आपल्या परीने मदत करीत असतात.यालाच पुण्यवान म्हणतात. रमजान महिन्याचा संदेश हाच आहे कि स्वतःसाठी जगतांना इतरांसाठी ही जगा. आपल्या कौटुंबिक गरजा पूर्ण करतांना आपल्या शेजारी परिसरात जे गोरगरीब आहेत त्यांना ही मदत करा तरच तुम्ही यशस्वी व्हाल. अन्यथा तुम्हाला येथे केलेल्या प्रत्येक कृत्याचा हिशोब कयामतच्या दिवशी दयावाच लागेल.
**(क्रमशः)**

**सलीमखान पठाण**

# 'जेजीपीएल'मध्ये नानाश्री फाऊंडेशनचा संघ ठरला 'बाजीगर' !

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी**
**समाधान पाटील**



**जळगाव :** ग्रामीण परिसरात क्रिकेटला चालना मिळावी म्हणून नुकतीच जळगाव ग्रामीण प्रीमिअर लीग संपन्न झाली. शहरातील मनराज पार्क येथे रंगलेल्या या लीगमध्ये त्रिमूर्ती फाऊंडेशनच्या संघाने पहिल्याच वर्षाच्या ट्रॉफीवर आपले नाव कोरले. मात्र या पहिल्याच वर्षात नानाश्री फाऊंडेशन या संघाने आपल्या दिमाखदार कामगिरीने प्रेक्षकांची मने जिंकत ही स्पर्धा गाजवली. जळगाव ग्रामीण स्पोर्टस् फाऊंडेशन यांच्यामार्फत २७ फेब्रुवारी ते ३ मार्च दरम्यान मानराज पार्क येथे जळगाव ग्रामीण प्रिमियर लीग संपन्न झाली. या स्पर्धेत जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबरावजी पाटील हे मुख्य प्रायोजक होते. या स्पर्धेत तब्बल २४ संघांचा सहभाग होता. दरम्यान सदर स्पर्धेवर त्रिमूर्ती फाऊंडेशनच्या संघाने विजेतेपद मिळवत नाव कोरले असून या स्पर्धेत नानाश्री फाऊंडेशनच्या संघानेही दिमाखदार कामगिरी करत क्रिकेटप्रेमींची मने जिंकली. जिल्हा मार्केटींग फेडरेशनचे संचालक शांताराम सोनवणे तथा युवासेनेचे स्वप्निल सोनवणे यांच्या मालकीच्या नानाश्री फाऊंडेशन संघाने किरण पाटील यांच्या नेतृत्वात सांघिक कामगिरी केली. स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात संघाने प्रविण पाटील यांच्या संघावर ९ बळींनी मात करत स्पर्धेचा धडाक्यात शुभारंभ केला. दुसर्‍या सामन्यात संघाने छत्रपती फाऊंडेशनच्या संघावर १२ धावांनी विजय मिळवत उप उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला. तर लीगच्या अखेरच्या सामन्यात मात्र नानाश्री फाऊंडेशनला श्रेया कन्स्ट्रक्शनने ६ बळींनी मात दिली. उप उपांत्यपूर्व सामन्यात नानाश्री फाऊंडेशनने धारदार गोलंदाजीच्या आधारावर शिरसोली वॉरियर्स संघाला ९ बळींनी चित करत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला. मात्र उपांत्यपूर्व फेरीत त्रिमुर्ती फाऊंडेशनने रोमांचक झालेल्या सामन्यात नानाश्री फाऊंडेशनवर अवघ्या ६ धावांनी विजय मिळवला व नानाश्री फाऊंडेशनचे विजेतपदाचे स्वप्न भंगले. या सामन्यात अखेरच्या षटकात नानाश्री फाऊंडेशनला विजयासाठी ३७ धावांची आवश्यकता असतानाच योगशे पाटील यांनी वादळी खेळी करत अखेरच्या षटकाच्या पाच चेंडूंवर सलग पाच षटकार लगावत सामना रोमांचक बनवला. मात्र अखेरच्या चेंडूवर त्यांना पराभव पत्करावा लागला. स्पर्धेत नानाश्री फाऊंडेशनचे मयुर सपकाळे ( १३५ धावा व ६ बळी ) यांनी अष्टपैलू कामगिरी केली तर चेतन पवार ( ९१ धावा ), कल्पेश सोनवणे ( ७ बळी ), गजानन सपकाळे ( ६ बळी ) आदींनीही आपल्या दर्जेदार खेळाने ही स्पर्धा गाजवली. नानाश्री फाऊंडेशनचा संघ उपांत्यपूर्व फेरीत पराभूत झाला असला तरी आपल्या वादळी फलंदाजीने सदर संघ संपूर्ण स्पर्धेत चर्चेत राहिला. यामुळेच की काय नानाश्री फाऊंडेशन या स्पर्धेत पराभूत होऊनही खर्‍या अर्थाने 'बाजीगर' ठरला आहे.